# गुणवान विद्यार्थांना आर्थिक सहाय्य (वरिष्ठ स्तर)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | गुणवान विद्यार्थांना आर्थिक सहाय्य (वरिष्ठ स्तर) |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 17.5.1984, 01.03.2011 व 11.09.2003 |
| ३ | योजनेचे स्वरूप | शासन निर्णयानूसार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई, पुणे, लातूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापुर, अमरावती, नागपुर व कोकण या विभागातील परीक्षेत गुणवान विद्यार्थ्यांची प्रतिवर्षी खालीलप्रमाणे निवड करण्यात येते.<br>१. सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधून पहिले पाच विद्यार्थी (5)<br>२. गुणवत्तेनुसार पहिल्या दोन मुली (2)<br>३. मागासवर्गातील विद्यार्थ्यांमधून पहिले दोन विद्यार्थी (2)<br>४. विज्ञान विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी (2)<br>५. कला विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी (2)<br>६. वाणिज्य विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी (2)<br>प्रत्येक विभागात एकूण 15 याप्रमाणे 9 विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या 135. |
| ४ | योजनेचा उद्देश | गुणवान विद्यार्थांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | 1 उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणारे गुणवान विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती साठी पात्र आहेत.<br>2 सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीच्या आधारे निवड पत्र पाठविण्यात येते. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना सदर पत्राची छायांकित प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.<br>3 पात्र विद्यार्थांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. संबंधित यादीमध्ये नाव असलेले विद्यार्थीच सदर शिष्यवृत्तीसाठी (Fresh) अर्ज करु शकतात.<br>4 सदर यादीतील महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर शिकत असलेले महाराष्ट्रीयन विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात.<br>5 शिष्यवृत्ती पुढे चालू राहण्यासाठी विद्यार्थ्यांचे वर्तन, प्रगती समाधानकारक असणे आवश्यक आहे.<br>6 या योजनेचा लाभ घेत असतांना विद्यार्थ्यांला केंद्र अथवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीच्या अथवा सवलतीचा लाभ घेता येणार नाही,<br>मात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही अट लागू नाही, त्यांना केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / सवलती नुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फी ची भरपाई होत असेल तर अशी शिक्षण फी किंवा परीक्षा फी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय नाही.<br>तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. मात्र राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती नुसार मिळणाऱ्या पुस्तक अनुदानाची रक्कम वजा करून सदर शिष्यवृत्तीसाठी पुस्तक अनुदानाची रक्कम देय आहे.<br>7 गुणवान विद्यार्थ्यास एखाद्या वर्षी गुणाची टक्केवारी कमी असल्यास त्याचे त्यावर्षी आर्थिक सहाय्य स्थगीत ठेवण्यात येईल. पुढील वर्षी सदर विद्यार्थ्यास गुणाची अट पूर्ण केल्यास त्याचे आर्थिक सहाय्य सुरु करण्यात येईल.<br>8 मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.<br>9 वरिष्ठ महाविद्यालय :- नूतनीकरनासाठी मागील वर्षात विद्यार्थ्यांना किमान ६५ टक्के गुण आवश्यक.<br>10 नूतनीकरनासाठी विद्यार्थ्यांनी मागील वर्षाचा Application ID चा उपयोग करावा. |

| | | |
|---|---|---|
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1. मागील वर्षाची गुणपत्रिका.<br>2. चालू वर्षाची शुल्क भरल्याची पावती.<br>3. वसतिगृहाचे शुल्क भरल्याची पावती.<br>4. उच्च शिक्षण संचालनालयाकडील (DHE) शिष्यवृत्ती मंजूरीचे पत्र.<br>5. वैद्यकीय खर्चाबाबतची पावती (असल्यास) |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे 11 प्रकारच्या शुल्काचा लाभ देण्यात येतो.<br>1. प्रवेश शुल्क - 100 टक्के<br>2. सत्र शुल्क - 100 टक्के<br>3. भोजन शुल्क - 150 रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = 1500 रु.<br>4. वैद्यकीय खर्च - विद्यार्थ्यांचा झालेला खर्च किंवा रु. 120 यापैकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम.<br>5. परीक्षा शुल्क - 100 टक्के<br>6. शिक्षण शुल्क - 100 टक्के<br>7. ग्रंथालय शुल्क - 100 टक्के<br>8. पुस्तके व इतर स्टेशनरी साहित्य -<br>a) 11 वी, 12 वी - 300 रु. वार्षिक<br>b) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रम वगळून) - 500 रु. वार्षिक<br>c) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रमासाठी) - 700 रु. वार्षिक<br>d) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम - 1000 रु. वार्षिक<br>e) पदवीका अभ्यासक्रम - 500 रु. वार्षिक<br>9. वसतीगृह शुल्क - 600 रु. वार्षिक<br>10. प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के<br>11. जिमखाना शुल्क - 100 टक्के<br><br>* शासनमान्य व अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये यामध्ये मान्य दराने आकारल्या जाणा-या फी ची प्रतिपूर्ती. विना अनुदानित पण शासनमान्य अशा अभियांत्रिकी / वैद्यकीय महाविद्यालयात अथवा तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी / वैद्यकीय महाविद्यालये, तांत्रिक संस्था यामध्ये आकारल्या जाणा-या फीच्या दराने प्रतिपूर्ती करण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |